

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक २९९ * नांदेड * सोमवार, दि. ९ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

सलग दुसऱ्या दिवशी पार्थ पवार शरद पवारांच्या भेटीला

राष्ट्रवादी विलनीकरणाच्या चर्चांना पुन्हा जोर

पुणे (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवारांना ब्रीच कँडी रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यावर शनिवारी संध्याकाळी पार्थ पवारांनी शरद पवारांची भेट घेतली. शरद पवारांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक निवासस्थानी जाऊन पार्थ पवारांनी त्यांची भेट घेतली. यावेळी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि जितेंद्र आव्हाडही उपस्थित होते. तब्बल दीड तास पवारांची भेट घेतल्यावर पार्थ पवार निघाले.

राज्याचे ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांना शनिवारी ब्रीच कँडी रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. त्यानंतर, शरद पवार त्यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी गेले. तेथे शरद पवारांची अनेक नेत्यांनी भेटीगाठी घेतल्या.

अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी दोन दिवसांपूर्वी ब्रीच कँडी रुग्णालयात शरद पवारांची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आलं आहे. या भेटीत राजकीय विषयांवरही चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान शरद पवार आणि प्रफुल पटेल यांच्यातील संवादाचा व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये शरद पवार यांनी १० तारखेनंतर एकत्र बसून चर्चा करू, असं प्रफुल पटेल यांना सांगितलं. त्यामुळे १० तारखेनंतर नेमकी कोणत्या विषयावर चर्चा होणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

गोदाकाठावर उद्या रंगणार दिवाळी पाडवा पहाट

नांदेड (प्रतिनिधी)- दरवर्षीप्रमाणे यावर्षीही नांदेडकरांची दिवाळी पाडवा पहाट सुमधुर आणि सुरमयी असणार आहे. शहरातील गोदाकाठावर बंदाघाट येथे दरवर्षी दिवाळी पहाट या सांगितीक कार्यक्रमाचे आयोजन होत असते. त्याप्रमाणे यावर्षीही दि. १० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ५. ३० वाजता, बंदाघाट येथे शेतकऱ्यांना समर्पित दिवाळी पाडवा पहाट हा कार्यक्रम होत आहे.

नांदेड उत्सव समिती, गुरुद्वारा बोर्ड, स्वरमेघ म्युझिक कल्चर यांच्या संयुक्त विद्यमाने या 'शेतकऱ्यांना समर्पित दिवाळी पाडवा पहाट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सध्याच्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आपला अन्नदाता शेतकरी अडचणीत सापडलेला आहे. संकटाच्या या काळात संगीताच्या माध्यमातून धीराने या संकटाला सामोरे जाण्यासाठीचा संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात शेतकऱ्यांवर आणि कृषी क्षेत्रावर आधारित गीतंही सादर केली जाणार आहेत.


या कार्यक्रमात संयोजक तथा संपादक केशव घोणसे पाटील, प्रख्यात गायिका आणि स्वरमेघ म्युझिक कल्चरच्या मेघा गायकवाड, दीपक गिरी (प्रख्यात गायक, छत्रपती संभाजीनगर), शुभम गोसावी (गायक, छत्रपती संभाजीनगर), प्रभा पत्की (गायिका, नांदेड), अनु नितनवरे (गायिका, नांदेड), शशिकांत जोशी (गायक, नांदेड) हे विविध मराठी-हिंदी गीतं सादर करणार आहेत.


या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीचे डॉ.हंसराज वैद्य, इंजि. संजीवन गायकवाड, भार्गव राजे, डॉ.दत्ता मोरे, ॲड. अनिल पाटील, बालाजी इबितदार, गजानन पाटील मुधोळ, बालाजी इंगळे खानापूरकर, अतुल बुरेवार, आशुतोष घोणसे पाटील आदींनी केले आहे.

पंतप्रधान मोदींनी सैनिकांसोबत केली दिवाळी साजरी

नवी दिल्ली (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्तीसगडमधील बस्तर येथे सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली. पंतप्रधान मोदींनी दिवाळीनिमित्त छत्तीसगडमधील बस्तर येथे सुरक्षा दलांसोबत दिवाळी साजरी केली.

यावेळी त्यांनी सैनिकांना उद्देशून भाषणही केले. ते म्हणाले की, ही पहिली दिवाळी आहे, जेव्हा देशातील प्रत्येक जिल्हा नक्षलवादापासून मुक्त झाला आहे. त्यांनी जागतिक बँकेच्या एका अहवालाचाही उल्लेख केला, ज्यात म्हटले आहे की, ५० कोटी भारतीय गरिबीतून बाहेर आले आहेत.











जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

लोकशाहीचा आत्मा कोण आहे?

लोकशाही व्यवस्थेचा पाया निवडणुकीवर आणि निवडणुकीचा पाया मतदारावर उभा असतो. त्यामुळे एखाद्या नागरिकाला मतदानाच्या अधिकारापासून वंचित करणे म्हणजे केवळ मतदार यादीतील एक नाव वगळणे नव्हे, तर त्या नागरिकाचा लोकशाही प्रक्रियेतील आवाजच हिरावून घेणे होय. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी मतदारांची मोठ्या प्रमाणावर हकालपट्टी करणारी कोणतीही प्रशासकीय प्रक्रिया 'मूलतः मनमानी' आणि 'घटनात्मक व्यवस्थेचा निषेध' ठरेल, असा इशारा दिल्याचे वृत्त आहे. हा इशारा भारतीय लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांकडे पुन्हा गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित करतो. मतदार याद्या अद्ययावत, अचूक आणि पारदर्शक ठेवणे ही निवडणूक व्यवस्थेची अपरिहार्य जबाबदारी आहे. मृत व्यक्तींची नावे, स्थलांतरित मतदारांची दुबार नोंदणी किंवा अन्य त्रुटी दूर करणे आवश्यकच आहे. परंतु या प्रक्रियेच्या नावाखाली वैध मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर वगळली जात असतील, तर प्रश्न केवळ प्रशासकीय कार्यक्षमतेचा राहत नाही; तो थेट घटनात्मक अधिकारांचा बनतो. भारताच्या संविधानाने प्रौढ नागरिकांना मतदानाचा अधिकार देऊन लोकशाहीचा पाया मजबूत केला आहे. कलम ३२६ मधील प्रौढ मताधिकार आणि कलम १४ मधील कायद्यापुढील समानता ही केवळ पुस्तकातील तत्त्वे नाहीत. या तरतुदींचा केंद्रबिंदू सामान्य नागरिक आहे. गरीब असो वा श्रीमंत, ग्रामीण असो वा शहरी, वंचित असो वा सधन, प्रत्येक पात्र नागरिकाचा राजकीय आवाज समान असणे हे लोकशाहीचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. याच ठिकाणी मतदार यादीच्या विशेष पुनरावलोकनासारख्या प्रक्रियांकडे अत्यंत सावधपणे पाहण्याची गरज आहे. एखाद्या नागरिकाकडून कागदपत्रे सादर करण्याची अपेक्षा ठेवताना त्याच्याकडे आवश्यक कागदपत्रे नसण्याची सामाजिक, आर्थिक आणि ऐतिहासिक कारणेही लक्षात घेतली पाहिजेत. स्थलांतरित कामगार, आदिवासी, गरीब, बेघर, वृद्ध, महिला आणि इतर वंचित घटकांना प्रशासकीय प्रक्रियेत अडचणी येऊ शकतात. त्यामुळे पडताळणीची प्रक्रिया जितकी काटेकोर असेल तितकीच ती मानवी आणि सुलभ असणेही आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नाव वगळण्यापूर्वी नागरिकाला प्रभावी संधी मिळते का? त्याला कारण कळते का? हरकतीसाठी पुरेसा वेळ दिला जातो का? अपीलची व्यवस्था सहज उपलब्ध आहे का? अपील प्रलंबित असताना त्याच्या मतदानाच्या अधिकाराचे काय? या प्रश्नांची स्पष्ट आणि पारदर्शक उत्तरे लोकशाही व्यवस्थेच्या विश्वासार्हतेसाठी अत्यावश्यक आहेत. मतदार यादी शुद्ध करण्याच्या नावाखाली जर वैध मतदारच मतदानापासून दूर झाले, तर शुद्धतेच्या प्रयत्नाचा हेतूच पराभूत होतो. निवडणूक स्वच्छ असण्याइतकेच मतदारांचा समावेश सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे. कारण मतदारच नसेल तर निवडणुकीतील स्पर्धा कितीही निष्पक्ष असली तरी लोकशाही प्रतिनिधित्व अपूर्ण राहते. यातून आणखी एक गंभीर धोका निर्माण होऊ शकतो की नागरिकांचे दोन वर्ग तयार होतील. ज्यांना मतदानाचा अधिकार आहे आणि ज्यांचे नाव प्रशासकीय प्रक्रियेतून वगळले गेले आहे, असे दोन वर्ग निर्माण झाले तर समान नागरिकत्वाच्या संकल्पनेलाच धक्का बसतो. न्यायमूर्ती भुयान यांनी मतदानाचा अधिकार हिरावून घेण्याची तुलना शरीरातून आत्मा काढून घेण्याशी केली, हे रूपक याच धोक्याची तीव्रता अधोरेखित करते. तथापि, या संपूर्ण प्रक्रियेकडे राजकीय चष्म्यातून पाहणेही टाळले पाहिजे. मतदार याद्यांच्या शुद्धीकरणाला राजकीय हेतू असल्याचा आरोप झाला असेल, तर त्याची स्वतंत्र, पारदर्शक आणि पुराव्यावर आधारित चौकशी झाली पाहिजे. आरोप करणाऱ्यांनीही ठोस तथ्ये मांडली पाहिजेत आणि प्रशासनानेही प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आकडेवारी व नोंदींच्या आधारे दिले पाहिजे. लोकशाहीमध्ये आरोप-प्रत्यारोपांपेक्षा सत्यापनाला अधिक महत्त्व असले पाहिजे. न्यायपालिका ही या प्रक्रियेवर घटनात्मक पहारा देणारी महत्त्वाची संस्था आहे. निवडणूक आयोग, प्रशासन, राजकीय पक्ष आणि न्यायपालिका, सर्वांनी आपापल्या घटनात्मक मर्यादा आणि जबाबदाऱ्या जपल्या तरच मतदारांचा विश्वास कायम राहू शकतो. निवडणुकीची प्रक्रिया केवळ तांत्रिक किंवा प्रशासकीय बाब नाही; ती नागरिकांच्या सार्वभौम राजकीय इच्छेचे प्रतिबिंब आहे. लोकशाहीतील सर्वात मोठी भीती मतदानाचा निकाल बदलण्याची नसते; तर पात्र नागरिकाला मतदानाची संधीच न मिळण्याची असते. म्हणून मतदार यादीतील प्रत्येक नाव हे केवळ एक नाव नसून एका नागरिकाचा घटनात्मक आवाज आहे. तो आवाज वगळताना प्रशासनाने अत्यंत सावध, पारदर्शक आणि उत्तरदायी असले पाहिजे. मतदार यादी स्वच्छ हवीच; पण ती नागरिकविरहित स्वच्छ यादी होता कामा नये. लोकशाहीची खरी कसोटी मतदारांची संख्या कमी करण्यात नाही, तर प्रत्येक पात्र नागरिकाचा आवाज सुरक्षित ठेवण्यात आहे. कारण मतदानाचा अधिकार हिरावला तर नागरिक केवळ निवडणुकीपासून दूर राहत नाही, तो आपल्या प्रजासत्ताकातील समान नागरिकत्वाच्या अनुभूतीपासूनही दूर जातो.

पुराणातील बळीराजा आणि आधुनिक समाजव्यवस्थेपुढील त्याच्या विचारांचे महत्त्व

दिवाळीचा पाडवा म्हणजेच बळीप्रतिपदा! हा दिवस केवळ सण, परंपरा आणि शुभेच्छांपुरता मर्यादित नाही, तर भारतीय लोकपरंपरेत तो बळीराजाच्या स्मृतीशी जोडलेला आहे. बळीराजा म्हटले की डोळ्यांसमोर उभे राहते ते न्यायप्रिय, प्रजाहितदक्ष, दानशूर आणि समतेचा विचार जपणारे लोककल्याणकारी राज्य.त्यामुळे बळीप्रतिपदा हा दिवस केवळ धार्मिक भावनेतून नव्हे, तर सामाजिक समता, न्याय, लोककल्याण आणि विवेकनिष्ठ विचारांच्या दृष्टिकोनातूनही समजून घेण्याची गरज आहे.

भारतीय पुराणपरंपरेतील बळीराजा हा प्रल्हादाचा नातू आणि विरोचनाचा पुत्र मानला जातो.तो महादानी, पराक्रमी आणि प्रजेवर प्रेम करणारा राजा म्हणून वर्णिला आहे. विष्णूच्या वामनावताराची कथा त्याच्याशी जोडलेली आहे. वामनाने तीन पावलांची भूमी मागितली आणि बळीराजाने ती दान करण्याचे वचन दिले. पहिल्या दोन पावलांत पृथ्वी आणि आकाश व्यापल्यानंतर तिसरे पाऊल ठेवण्यासाठी बळीराजाने स्वतःचे मस्तक पुढे केले, अशी पुराणकथा सांगते. या कथेत दानशीलता, वचनपालन आणि त्यागाचे प्रतीक म्हणून बळीराजा समोर येतो.

मात्र, या कथेचा अर्थ केवळ धार्मिक आख्यानापुरता मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. विविध सामाजिक आणि वैचारिक परंपरांनी बळीराजाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून पाहिले आहे.विशेषतः महाराष्ट्रातील बहुजन लोकपरंपरेत बळीराजा हा न्याय, समता, श्रमप्रतिष्ठा आणि लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेचे प्रतीक मानला जातो.

विचारवंत आ. ह. साळुंखे यांनी आपल्या वैचारिक लेखनातून भारतीय संस्कृती, पुराणकथा, परंपरा आणि बहुजन समाजाच्या सांस्कृतिक जाणिवांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची भूमिका मांडली आहे. त्यांच्या विचारविश्वातून प्रेरणा घेताना बळीराजाच्या कथेकडे अंधश्रद्धेने किंवा केवळ कर्मकांडाच्या चौकटीत न पाहता,



तिच्यातील सामाजिक आशय, सत्तासंबंध आणि मूल्यव्यवस्थेचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते. परंपरेचा आदर करतानाच तिचे विवेकनिष्ठ परीक्षण करण्याची हीच खरी वैचारिक भूमिका आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांनीही 'बळीराजा' या संकल्पनेला सामाजिक आणि सांस्कृतिक अर्थ दिला.त्यांच्या विचारविश्वात बळीराजा हा बहुजनांच्या न्याय्य, समताधिष्ठित आणि शोषणमुक्त समाजव्यवस्थेचे प्रतीक बनतो. त्यामुळे बळीप्रतिपदेचा विचार करताना फुले यांच्या समतावादी दृष्टिकोनाचाही संदर्भ महत्त्वाचा ठरतो.

बळीराजाच्या राज्याची कल्पना आजच्या काळातही अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्यास मदत करते.शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळणे, श्रमिकांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळणे, स्त्री-पुरुष समानता, जातिभेदमुक्त समाज, सर्वांना शिक्षणाच्या समान संधी आणि सत्तेच्या केंद्रस्थानी सामान्य माणसाचे हित असणे, हीच बळीराजाच्या लोककल्याणकारी संकल्पनेची आधुनिक रूपे म्हणता येतील.

आजच्या संदर्भात बळीराजाच्या विचारांचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवते.एकीकडे शेतकरी निसर्गाच्या लहरीपणाशी संघर्ष करीत आहे, तर दुसरीकडे उत्पादन खर्च, बाजारभाव, कर्जबाजारीपणा आणि आर्थिक असुरक्षिततेचा सामना करीत आहे. कष्टकरी, शेतमजूर, महिला, वंचित आणि दुर्बल घटक आजही समान संधींसाठी संघर्ष करीत आहेत. अशा परिस्थितीत 'इडा पीडा टळो, बळीचे राज्य येवो' ही लोकपरंपरेतील प्रार्थना केवळ उच्चारण्यापुरती न राहता ती प्रत्यक्ष सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाची दिशा बनली पाहिजे.

बळीराजाचे राज्य म्हणजे कोणत्याही एका जातीचे, धर्माचे अथवा वर्गाचे वर्चस्व नव्हे; तर प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता येईल, श्रमाला न्याय मिळेल आणि कोणावरही अन्याय होणार नाही, अशी समाजव्यवस्था होय.आधुनिक लोकशाहीत संविधानाने दिलेली स्वातंत्र्य, सम ता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये बळीराजाच्या लोककल्याणकारी संकल्पनेशी जोडून पाहता येतात. मात्र, त्यासाठी केवळ प्रतीकांचे पूजन न करता त्या मूल्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

सण-उत्सव हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम असतात. परंतु प्रत्येक सणातून एखादा विधायक विचारही पुढे आला पाहिजे.बळीप्रतिपदेच्या निमित्ताने आपण शेतकऱ्याच्या श्रमाचा सन्मान करतो का? समाजातील विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न करतो का? शिक्षण, आरोग्य आणि संधी सर्वांपर्यंत पोहोचवतो का? स्त्रियांना समान प्रतिष्ठा आणि अधिकार देतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधणे हीच बळीराजाच्या स्मृतीला खरी आदरांजली ठरेल.

आज गरज आहे ती भूतकाळातील परंपरांचे अंधानुकरण करण्याची नव्हे, तर त्यातील मानवतावादी, समतावादी आणि विवेकनिष्ठ मूल्ये स्वीकारण्याची. श्रद्धा असावी, पण ती विवेकाच्या प्रकाशात असावी. परंपरा जपावी, पण अन्यायकारक रूढींना प्रश्न विचारण्याचे धैर्यही असावे. विकास व्हावा, पण त्यात शेवटच्या माणसाचे हित दुर्लक्षित होता कामा नये.

बळीप्रतिपदा २०२६ च्या निमित्ताने आपण बळीराजाचे केवळ स्मरण न करता त्याच्या नावाने व्यक्त झालेल्या समतेच्या स्वप्नाचा जागर करूया. शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान, श्रमिकांच्या जीवनात सुरक्षितता, महिलांना सन्मान, मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि प्रत्येक माणसाला न्याय मिळेल, अशी समाजव्यवस्था उभी करण्याचा संकल्प करूया.

कारण बळीराजाचे खरे राज्य एखाद्या पुराणकथेत किंवा इतिहासाच्या पानांत शोधण्यापेक्षा ते आपल्या वर्तमानातील कृतीत निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे.ज्या दिवशी समाजातील शेवटच्या माणसालाही सन्मानाने जगण्याचा अधिकार प्रत्यक्ष मिळेल, त्या दिवशीच बळीराजाच्या समतेच्या स्वप्नाला खऱ्या अर्थाने उजाळा मिळेल.

इडा पीडा टळो, अन्याय-असमानता मिटो आणि समतेचे, न्यायाचे, माणुसकीचे बळीराज्य येवो!

-पंडित पवळे
नांदेड

महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अजूनही अनुत्तरित!



महिला सक्षमीकरण, स्त्री-पुरुष समानता आणि महिला स्वातंत्र्याच्या गप्पा आज सर्वत्र मारल्या जात आहेत. महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. शिक्षण, विज्ञान, उद्योग, राजकारण, क्रीडा, संरक्षण आणि सामाजिक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. मात्र, एवढी प्रगती होऊनही महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आजही गंभीर आणि अनुत्तरितच आहे.

एकीकडे महिला प्रगतीची नवी शिखरे गाठत असताना दुसरीकडे अत्याचार, विनयभंग, छेडछाड, कौटुंबिक हिंसाचार आणि लैंगिक शोषणाच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे महिलांनी खरोखरच सुरक्षित वातावरणात जगायचे तरी कसे, हा प्रश्न निर्माण झाला आही. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न केवळ घराच्या चार भिंतींपुरता मर्यादित राहिलेला नाही. सार्वजनिक ठिकाणे, शाळा, महाविद्यालये, कामाची ठिकाणे, प्रवासाची साधने तसेच समाज-माध्यमे अशा विविध ठिकाणी महिलांना असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे, अनेकदा ओळखीच्या व्यक्तींकडूनच महिलांवर अत्याचार होत असल्याचे दिसून येते. घराबाहेर पडताना मुलींच्या सुरक्षिततेची चिंता पालकांना सतावत असते. रात्रीच्या वेळी महिलांनी एकट्याने प्रवास करू नये, विशिष्ट ठिकाणी जाऊ नये, असे सल्ले दिले जातात. मात्र, प्रश्न असा आहे की, महिलांनीच स्वतःच्या हालचालींवर मर्यादा घालून घ्यायच्या की समाजाने आपली मानसिकता बदलायची?

महिलांवरील अत्याचाराच्या घटना घडल्यानंतर काही दिवस समाज-माध्यमांवर संताप व्यक्त होतो. निषेध मोर्चे निघतात, कठोर शिक्षेची मागणी केली जाते आणि प्रशासनाकडून कारवाईचे आश्वासन दिले जाते. मात्र, काही दिवसांनंतर पुन्हा परिस्थिती पूर्वपदावर येते. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रतिबंधा-त्मक उपाययोजना कितपत प्रभावी ठरतात, याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. केवळ घटना घडल्यानंतर कारवाई करून चालणार नाही, तर अशा घटना घडूच नयेत यासाठी सक्षम व्यवस्था उभी करावी लागेल.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदे आणि विविध योजना अस्तित्वात आहेत. महिला हेल्पलाइन, पोलीस मदत केंद्रे, महिला तक्रार निवारण कक्ष आणि विविध संरक्षणात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत. परंतु, या सुविधांची माहिती सर्वसामान्य महिलांपर्यंत पोहोचते का? तक्रार दाखल केल्यानंतर महिलांना त्वरित न्याय मिळतो का? अनेकदा सामाजिक प्रतिष्ठा, बदनामीची भीती, कौटुंबिक दबाव आणि न्यायप्रक्रियेतील विलंब यामुळे महिला तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. त्यामुळे कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि पीडित महिलांना मानसिक, सामाजिक व कायदेशीर आधार देणे तितकेच महत्त्वाचे आहे. महिलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी केवळ पोलीस प्रशासन किंवा शासनाची नाही, तर संपूर्ण समाजा-ची आहे. मुलांच्या संगोपनापासूनच स्त्री-पुरुष समानतेचे संस्कार रुजविणे आवश्यक आहे. मुलींना स्वतःचे संरक्षण करण्याचे शिक्षण देण्याबरोबरच मुलांना महिलांचा आदर करण्याची शिकवण देणे अधिक महत्त्वाचे आहे. स्त्री ही उपभोगाची वस्तू नसून स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेली समान हक्कांची नागरिक आहे, ही जाणीव प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली पाहिजे. महिलांच्या

कपड्यांवर, वागण्यावर किंवा स्वातंत्र्यावर प्रश्न उपस्थित करण्याऐवजी अत्याचार करणाऱ्या विकृत मानसिकतेला आळा घालण्याची गरज आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी पुरेशी प्रकाशव्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक, नियमित पोलीस गस्त आणि तातडीची मदत यंत्रणा उपलब्ध असणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि कार्यस्थळांवर महिला सुरक्षा समित्या प्रभावीपणे कार्यरत असाव्यात. तक्रार करणाऱ्या महिलांना दोष देण्याऐवजी त्यांचे म्हणणे संवेदनशीलतेने ऐकून घेणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे ही प्रशासनाची प्राथमि क जबाबदारी असली पाहिजे.

आज डिजिटल युगात महिलांच्या सुरक्षिततेसमोर सायबर गुन्ह्यांचे नवे आव्हान उभे राहिले आहे. सोशल मीडियावर अश्लील संदेश पाठविणे, फोटोचा गैरवापर करणे, ऑनलाइन बदनामी करणे, पाठलाग करणे आणि धमक्या देणे अशा प्रकारांना महिलांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि अशा गुन्ह्यांविरुद्ध तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे. महिलांना सुरक्षितता मिळाल्याशिवाय महिला सक्षमीकरणाचा विचार पूर्ण होऊ शकत नाही. महिला निर्भयपणे घराबाहेर पडू शकत नसतील, आपल्या आवडीचे शिक्षण घेऊ शकत नसतील किंवा करिअरच्या संधींचा लाभ घेऊ शकत नसतील, तर विकासाच्या दाव्यांना अर्थ उरत नाही. महिलांना संरक्षण देण्यापेक्षा त्यांना सुरक्षित वातावरणात सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे ही काळाची गरज आहे.

महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा केवळ महिलांचा प्रश्न नसून संपूर्ण समाजाच्या संस्कृतीचा, मानसिकतेचा आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी केवळ घोषणा, आश्वासने आणि कायदे पुरेसे नाहीत, तर त्यांची प्रामाणिक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. प्रत्येक मुलगी आणि महिला निर्भयपणे जगू शकेल, अशी परिस्थिती निर्माण करणे ही शासन, प्रशासन आणि समाज या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यापेक्षा वर्षातील प्रत्येक दिवशी महिलांचा सन्मान आणि सुरक्षितता जपली गेली पाहिजे. अन्यथा महिला सक्षमीकरणाच्या घोषणा केवळ कागदावरच राहतील आणि महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न असाच अनुत्तरित राहील!.

-प्रा. संजय बडे
दहेगाव ता. वैजापूर, जि.
छत्रपती संभाजी नगर
मो. ७८८८२९७८५९

फुकट प्रवास करणे हा कृतघ्नपणा!

प्रतिदिन रेल्वेने फुकट प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या विरोधात पश्चिम रेल्वेने जोरदार मोहीम उघडली असून मागील सात महिन्यांत तब्बल १३८ कोटी ४ लक्ष रुपयांचा दंड या फुकट्यांकडून वसूल करण्यात आला आहे. विनातिकीट प्रवास, अनियमित तिकिटांवर प्रवास आणि विनानोंदणी सामानाची १७ लक्ष ९३ सहस्र प्रकरणे या सात महिन्यांत पश्चिम रेल्वेच्या तिकीट तपासणीसांनी उघडकीस आणली.

मुंबईच्या मध्य रेल्वे मार्गावरही प्रतिदिन ११ सहस्र प्रवासी विनातिकीट प्रवास करत असल्याची बातमी नुकतीच प्रकाशित झाली होती. खासगी वाहनांनी प्रवास करताना रोख पैसे देणारे कित्येक जण सरकारी वाहनांनी प्रवास करताना मात्र तिकीट काढणे टाळतात. प्रवाशांना तिकीट काढण्यास रांग लावावी लागू नये म्हणून सध्याच्या डिजिटल युगाला अनुसरून रेल्वेने मोबाईल ऍप्सही विकसित केले आहेत. याशिवाय स्वतःहून तिकीट काढून डिजिटल पेमेंट करता यावे आणि रांग लावण्याचा वेळ वाचावा यासाठी प्रत्येक रेल्वे स्थानकांत कितीतरी मशिन्स बसवण्यात आल्या आहेत. तरीही फुकट्या प्रवाशांमध्ये घट न होता उलट वाढच झाली आहे. नागरिकांना इच्छित स्थळी, कामाच्या ठिकाणी वेळेत पोहोचता यावे यासाठी रेल्वे प्रशासन ट्रेन सेवा अविरतपणे पुरवत असते.

मागील काही वर्षांत रेल्वे स्थानकांत आणि रेल्वे सेवांमध्ये अमूलाग्र सुधारणा झाल्या आहेत. लोकसंख्येचा विचार करून रेल्वेचे डबे वाढवण्यात



आले आहेत. दोन ट्रेनमधील वेळ कमी करून ट्रेनच्या फेऱ्या वाढवण्यात आल्या आहेत. रेल्वेचे डबे प्रशस्त करण्यात आले आहेत. रेल्वे स्थानकांसह रेल्वे गाड्यांचीही नियमित स्वच्छता कारण्यात येत आहे. प्रवाशांच्या सुविधेसाठी रेल्वे स्थानकांवरील पादचारी पुलांची संख्या वाढवण्यात येत आहे. चढ उतर करण्याचा त्रास वाचावा म्हणून स्वयंचलित जिने आणि लिफ्टची व्यवस्थाही प्रत्येक रेल्वे स्थानकांवर करण्यात आली आहे. उदघोषणांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. प्रवाशांच्या सुविधेसाठी स्वस्त दरात खाद्य पदार्थ पुरवणाऱ्या कॅंटीन सेवा प्रत्येक रेल्वे स्थानकांवर आहेत. प्रत्येक प्लॅटफॉर्मवर स्वच्छ प्रसाधनगृहे बांधण्यात आली आहेत.


सण, उत्सवाच्या काळात रेल्वे प्रशासन जादा गाड्या सोडते. गणेशोत्सव काळात तर रात्रभर ट्रेन्स चालू असतात. सरकार दरवर्षी हजारो कोटी रुपये रेल्वेसाठी खर्च करते. अल्प रुपयांच्या मोबदल्यात केवळ रेल्वेनेच लांबचा प्रवास करता येतो. देशाचे रेल्वे खाते प्रतिवर्षी कोट्यवधी रुपयांचे नुकसान सोसत असते. असे असतानाही आपण मात्र १०-२० रुपयांची तिकीटही काढायचे कष्ट घेत नाही. रेल्वेच्या या अविरत सेवेसाठी खरंतर कृतज्ञतेचा भाव ठेवून प्रत्येकाने स्वतःहून तिकीट काढूनच प्रवास करायला हवा. प्रत्येकाने तिकीट काढून प्रवास केला तर प्रतिदिन कोट्यवधी रुपये रेल्वे प्रशासनाला मिळून प्रवाशांसाठी अधिक सुविधा पुरवण्यास हातभार लागेल.

विनातिकीट प्रवास करणे हे शौर्य नसून निव्वळ कृतघ्नपणा आहे. अध्यात्मिक भाषेत सांगायचे म्हटले तर विनातिकीट प्रवास करणाऱ्यावर तिकीट तपासणीसा-ची दृष्टी पडली नाही तरी भगवंत त्याच्या दुष्कर्माकडे निश्चितच पाहत आहे आणि त्या कर्माचे फळ त्यांला कधीनाकधी कुठेनाकुठे भोगायचेच आहे.

आज तिकीट काढली नाही तर १० रुपये वाचतील पण त्या चुकीच्या कर्मामुळे आणि त्याच्या कर्मफळा-मुळे भविष्यात कित्येक पटीने त्याची भरपाई करावी लागेल. फुकट प्रवास करणे हा गुन्हा आहे त्यामुळे रेल्वेने दंडाचे प्रावधान केले आहे. फुकट प्रवास करून आपण रेल्वे प्रशासनासह स्वतःलाही फसवत असतो, आपल्या कुटुंबावर चुकीचे संस्कार करत असतो. फुकट लाभ घ्यायची सवय लागली तर ती कधीनाकधी अंगलट येते तेव्हा आर्थिक हानी तर होतेच शिवाय अब्रूचेही धिंडवडे निघतात.

– सौ. मोक्षदा घाणेकर,
काळाचौकी, मुंबई

मोदींची जवानांसोबत दिवाळी!



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाची दिवाळी अंतर्गत सुरक्षेचे प्रमुख केंद्र ठरलेल्या आणि नक्षलवादाच्या छायेतून बाहेर पडलेल्या छत्तीसगडम धील बस्तर येथील दुर्गम भागात तैनात असलेल्या वीर जवानांसोबत साजरी केली. २०१४ मध्ये पंतप्रधान झाल्यापासून सलग १३ वर्षे त्यांनी देशाच्या सीमेवर, विषम हवाम ानात आणि कठीण प्रसंगात सेवा बजावणाऱ्या जवानांसोबत दिवाळी साजरी करण्याची परंपरा कायम ठेवली आहे. देशाचा प्रमुख सण सैनिकांच्या सहवासात साजरा करणारा देशाचा पंतप्रधान हे संपूर्ण देशासाठीच नव्हे, तर प्रत्येक जवानासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत आले आहे.

मोदींनी बस्तरमध्ये सुरक्षा दलांच्या जवानांमध्ये उपस्थित राहून त्यांच्या अतुलनीय शौर्याचे आणि संयमाचे कौतुक केले. स्वतः च्या हाताने जवानांना मिठाई भरवून त्यांनी सणाचा गोडवा द्विगुणित केला. जवानांना संबोधित करताना ते म्हणाले, 'प्रतिकूल परिस्थिती आणि कठीण भूप्रदेशातही तुमचा संयम आणि शौर्य हे देशाच्या शांततेचे आधारस्तंभ आहेत. तुमचे बलिदान आणि सतर्कता यांमुळेच आज देशातील नागरिक निर्धास्तपणे आनंदाने सण साजरी करू शकत आहेत.'

दिवाळीचा प्रकाश फक्त घराघरांतच नव्हे, तर सीमेवर आणि देशाच्या कानाकोपऱ्यात डोळ्यात तेल घालून पहारा देणाऱ्या जवानांच्या मनातही उजळावा, हेच मोदींच्या या कृतीतून स्पष्ट दिसते. 'ज्याप्रमाणे दिवा स्वतः जळून सभोवतालचा अंधकार दूर करतो, त्याचप्रमाणे तुम्ही विषम आणि प्रतिकूल परिस्थितीतही देशसेवेचा आणि निर्भयतेचा प्रकाश पसरवत आ-हात,' हे त्यांचे उद्गारर सैनिकांच्या मनात देशभक्तीची नवी ज्योत प्रज्वलित करतात. पंतप्रधानांच्या या कल्पकतेला, संवेदनशीलतेला आणि देशप्रेमी दृष्टिकोनाला मनःपूर्वक सलाम !

– प्रा. विजय कोष्टी
कवठेमहांकाळ, जि. सांगली.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातून गावांचा कायापालट करा!

- नांदेड जिल्ह्याला राज्यात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांचे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना आवाहन
- उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पाच ग्रामपंचायतींसह सगरोळी व बारड ग्रामपंचायतींचा गौरव

नांदेड (प्रतिनिधी)– मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २.० च्या माध्यमातून गावांचा सर्वांगीण विकास साधून नांदेड जिल्ह्याला राज्यात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींनी नियोजनबद्ध आणि गुणवत्तापूर्ण काम करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी केले. जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाच्या वतीने अर्धापूर तालुक्यातील डौर येथील नंदीग्राम पर्यटन केंद्रात आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह जिल्हा परिषदेचे विभागप्रमुख, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.



अभियानातील प्रत्येक निकषाचा अभ्यास करून मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, कर वसुली, डिजिटल प्रशासन आणि लोकसहभाग या क्षेत्रांत ठोस कामे करावीत. जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांनी ग्रामपंचायतींना समन्वयातून सहकार्य करावे, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी पाटील यांनी दिले. कार्यशाळेत ग्रामपंचायतींच्या अडचणींवर चर्चा करताना गाव नमुना क्रमांक आठचे संगणकीकरण आणि कर वसुलीसाठी क्यूआर संकेत प्रणालीचा वापर करण्यावर भर देण्यात आला. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती व संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणी उपलब्धतेचे नियोजन, काटकसरीने वापर आणि गावपातळीवरील उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन केले.

अभियानाच्या पहिल्या फेरीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या येरगी (ता. देगलूर), बोंढार, नेरली व वडवणा, खडकी (ता. नांदेड), लखमापूर (ता. माहूर) आणि पिंपळगाव महादेव (ता. अर्धापूर) या पाच ग्रामपंचायतींच्या अधिकाऱ्यांचा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच क्यूआर संकेत प्रणालीद्वारे प्रभावी कर वसुली केल्याबद्दल सगरोळी (ता. बिलोली) आणि ९२८ किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा आधारित आदर्श ग्राम उपक्रम राबविल्याबद्दल बारड (ता. मुदखेड) ग्रामपंचायतीचा विशेष गौरव करण्यात आला. बारड ग्रामपंचायतीच्या उपक्रमासाठी शासनाने एक कोटी रुपयांचे पारितोषिक जाहीर केले आहे. ग्रामसेवक संघटनेचे अमृत शिंदे यांनी अभियान यशस्वी करण्याची ग्वाही दिली. ग्रामपंचायत अधिकारी मधुकर मोरे यांनी अभियानाचे सादरीकरण केले.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, डी. बी. गिरी, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माधव सलगर, डॉ. एस. बी. खुणे, डॉ. प्रवीणकुमार घुले, मयूरकुमार आंदेलवाड, अमित राठोड, राहुल रावसाहेब, डॉ. निलकुमार ऐतवडे, डॉ. संतोष सूर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात वडवणा-खडकीचा जिल्ह्यात तृतीय क्रमांक; २० लाखांचे पारितोषिक जाहीर



नांदेड (प्रतिनिधी)– स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामविकासाच्या विविध उपक्रमांतून आदर्श गावाची ओळख निर्माण करणाऱ्या नांदेड तालुक्यातील वडवणा- खडकी ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात जिल्ह्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ग्रामपंचायतीला २० लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर झाले आहे. या यशाबद्दल सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष नारायण कदम यांनी ग्रामस्थांचे आभार मानले आहेत.

नांदेड तालुक्यातील पहिली हागणदारीमुक्त ग्रामपंचायत म्हणून जिल्हास्तरावर सन्मान मिळवणाऱ्या वडवणा-खडकीने त्यानंतरही विकासाचा ध्यास कायम ठेवला. सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतीचे आजी-माजी सदस्य आणि ग्रामस्थांच्या सहकार्यातून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले. सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष नारायण कदम यांनी पुढाकार घेऊन गावात विविध विकासात्मक उपक्रम राबविले. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजाची जिल्हाभर चर्चा झाली. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, मेघना कावळी यांनीही गावाला भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली होती. यावेळी त्यांनी ग्रामस्थांच्या प्रयत्नांचे कौतुक केले होते.

या विकासप्रक्रियेत सरपंच पंचकला पोहरे, उपसरपंच राधा कदम, ग्रामपंचायत अधिकारी कमल तिडके, ग्रामपंचायत कर्मचारी मारोती कदम, ऑपरेटर रतन जोगदंड, कोमल पोहरे, संजय पोहरे, नागोराव कदम यांच्यासह गावातील तरुण-तरुणी, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

गावात 'डासमुक्त गाव' ही संकल्पना प्रभावीपणे राबवण्यात आली. घनकचरा व्यवस्थापनासाठी घंटागाडीची व्यवस्था करण्यात आली असून, प्रत्येक कुटुंबाला कचराकुंड्यांचे वाटप करण्यात आले. गावाच्या शेतीसाठी आवश्यक असणारे संपूर्ण पाणंद रस्ते पूर्ण करून घेण्यात आले. गावातील स्वच्छता, शिक्षण आणि आरोग्याला प्राधान्य देतानाच रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यासाठी नारायण कदम आणि ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला. जिल्हा परिषदेच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून गावाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले.

ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यक्षमता वाढवणे, उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देणे आणि ग्रामीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने सन २०२५-२६ पासून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू केले. या अभियानाला १७ सप्टेंबर २०२५ रोजी मान्यता देण्यात आली होती. १७ सप्टेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत हे अभियान राबवण्यात आले. तालुका, जिल्हा, महसुली विभाग आणि राज्यस्तरावर विविध समित्यांमार्फत ग्रामपंचायतींच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यात आले.

स्वच्छंद प्रतिष्ठानच्यावतीने दीपावली पहाटचे आयोजन

नवीन नांदेड (प्रतिनिधी)– स्वच्छंद प्रतिष्ठानच्या वतीने दीपावली पहाटचे आयोजन ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता संत श्री गुरूकुल गोपाळ चावडी येथे करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्वच्छंद प्रतिष्ठाणच्या वतीने दीपावली पहाटचे आयोजन करण्यात आले असून, यात लक्ष्मीकांत रवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कु. ईशवरी जोशी मुंबई, कु. कोशीकी अपस्तंभ यांच्या सुमधुर मराठी, हिंदी गीतांचा व भावगीत कार्यक्रम होणार आहे. या साथसंगत ओंकार क्षीरसागर, ईशांत जोशी, राघव जोशी, चिन्मय मठपती हे कलाकार उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन स्वच्छंद प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

केदारगुडा येथील गोशाळेची पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पाहणी

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता, साठवणूक व व्यवस्थापनाचा आढावा घेण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी हदगाव तालुक्यातील केदारगुडा येथील नामदेव महाराज गोपालन व ग्रामविकास प्रतिष्ठान, कोंडूर संचालित गोशाळेची आज पाहणी केली. यावेळी जिल्हा उपआयुक्त डॉ. सखाराम खुणे, सहायक आयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. सतीश खिल्लारे व पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. साईनाथ पवार उपस्थित होते.



पाहणीदरम्यान गोशाळेतील वाळलेल्या चाऱ्याचा साठा व साठवणूक व्यवस्थेची तपासणी करण्यात आली. संभाव्य चाराटंचाई लक्षात घेऊन चाऱ्याचा काटकसरीने वापर, आगाऊ साठवणूक, स्थानिक चारा संसाधनांचा प्रभावी वापर, निकृष्ट चाऱ्याचे पोषणमूल्य वाढविणे आणि चाऱ्याची नासाडी टाळण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पशुधनाला संतुलित आहार व पुरेसे स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सदर गोशाळेचा महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या परिपोषण योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. दुष्काळी परिस्थितीत गोशाळांमधील पशुधनाचे संरक्षण, योग्य पोषण आणि चाऱ्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्याला प्राधान्य देण्याचे आवाहन अधिकाऱ्यांनी केले.

अवैध सावकारी व जबरी कर्जवसुलीविरुद्ध नांदेड जिल्ह्यात विशेष मोहीम

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील अवैध सावकारी, शासनाने निर्धारित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक व्याज आकारणी आणि जबरीने कर्जवसुलीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी सहकार विभागामार्फत विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. अशा प्रकारांना बळी पडलेल्या नागरिकांनी कोणत्याही दबावाला न घाबरता निर्भयपणे तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली २४ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय सावकारी समितीच्या बैठकीत प्राप्त तक्रारींचा प्रकरणनिहाय आढावा घेण्यात आला. अवैध सावकारी करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदींनुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार जिल्ह्यातील परवानाधारक सावकारांची विशेष तपासणी सुरू असून, कर्जवाटप व वसुलीची पद्धत, परवान्यातील अटींचे पालन, व्याजदरांची आकारणी तसेच वसुली अधिकारी व कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासण्यात येत आहे.

शासनाच्या १६ सप्टेंबर २०१४ रोजीच्या अधिसूचनेनुसार शेतकऱ्यांना दिलेल्या तारण कर्जासाठी वार्षिक ९ टक्के, तर विनातारण कर्जासाठी १२ टक्के व्याजदर निर्धारित करण्यात आला आहे. शेतकऱ्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तींना दिलेल्या तारण कर्जासाठी १५ टक्के, तर विनातारण कर्जासाठी १८ टक्के वार्षिक व्याजदराची मर्यादा आहे. या मर्यादेपेक्षा अधिक व्याज आकारणे तसेच चक्रवाढ किंवा दंडव्याज आकारणे अनुज्ञेय नाही.

सद्यस्थितीत जिल्ह्यात १८८ वैध परवानाधारक सावकार असून, त्यापैकी ११४ सावकार नांदेड तालुक्यात आहेत. विशेष तपासणी मोहिमेंतर्गत आतापर्यंत ६२ सावकारांच्या दप्तरांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आवाहनानंतरच्या दहा दिवसांत अवैध सावकारीसंदर्भात २३ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी १५ तक्रारींची पडताळणी पूर्ण झाली आहे. उर्वरित तक्रारींवर कार्यवाही सुरू आहे.

सावकारांकडून जबरदस्तीने किंवा दबाव टाकून कर्जवसुली केली जात असल्यास अथवा निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक व्याज आकारले जात असल्यास नागरिकांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड किंवा संबंधित तालुक्याच्या उपनिबंधक अथवा सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात तक्रार नोंदवावी. प्राप्त तक्रारींची पडताळणी करून संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. त्यामुळे अवैध सावकारीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी नागरिकांनी पुढे येऊन तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन सहकार विभागाने केले आहे.

भोकर तालुक्यातील अनेक गावांत विकली जाते अवैधरीत्या देशी दारू: युवा पिढी बनली व्यसनाधीन

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांची डोळेझाक

भोकर (प्रतिनिधी)– तालुक्यातील अनेक गावांत अवैधरित्या देशी दारूची विक्री केली जात असून, ग्रामीण भागात अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. युवा पिढीसुद्धा व्यसनाधीन बनली असून, गावागावांत भांडणाचे प्रकार वाढले आहेत.

तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक गावांमध्ये भोकरमधून अवैधरित्या देशी दारू विक्रीसाठी नेली जाते आणि गावामध्ये सर्रास विक्री होत असल्याने सहज दारू उपलब्ध झाल्याने नवयुवक, शाळकरी विद्यार्थी, कामगार, रोजंदारी मजूर व्यसनाच्या आहारी जाऊन अनेकांचे संसार उध्वस्त होत आहेत, काही गावांमध्ये दारूबंदीसाठी महिलांनी पुढाकार घेऊन निवेदन दिले होते मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही पुन्हा गावांमध्ये दारू विक्री सुरू झाली आहे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक त्या अवैध दारू विक्री कडे दुर्लक्ष करतात, भोकर शहरातील परवानाधारक दुकानदार सुद्धा नियमबाह्य कारभार करीत असून त्यांच्यावर वचक राहिलेला नाही. बंद बारीच्या काळामध्येसुद्धा मागच्या दाराने दारू विक्री केली जाते. काही गावांना वाहनांमधून दारू पुरविल्या जाते.

अवैध देशी दारू विक्रीवर आळा घालण्यासाठी व परवानाधारक नियमानुसार देशी दारूची विक्री करतात की नाही यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तालुक्याला निरीक्षक नेमलेले असतात. भोकरमध्ये हातभट्टीची दारूसुद्धा विक्री केली जाते, रसायन मिश्रीत सिंधीची ही विक्री केल्या जात आहे. उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक याकडे दुर्लक्ष करीत असून ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये अनधिकृतरीत्या देशी दारू विक्री होत असताना पोलीस यंत्रणा व उत्पादन शुल्क हे कसे दुर्लक्ष करतात याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

किनवट येथील प्रशिक्षण केंद्रात १ डिसेंबरपासून ११६ वे प्रशिक्षण सत्र

नांदेड (प्रतिनिधी)– आदिवासी (अनुसूचित जमाती) प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, माहिती व मार्गदर्शन केंद्र, किनवट येथे १ डिसेंबर २०२६ पासून ११६ वे प्रशिक्षण सत्र सुरू करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी पात्र इच्छुक आदिवासी उमेदवारांकडून २७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

या प्रशिक्षणासाठी उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गातील असणे आवश्यक असून, किमान शालांत परीक्षा उत्तीर्ण असावे. उच्च शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. उमेदवारांची कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयात नावनोंदणी असणे आवश्यक आहे. नांदेड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांतील उमेदवारांचाही प्रवेशासाठी विचार केला जाणार आहे. उमेदवारांचे वय २७ नोव्हेंबर २०२६ रोजी किमान १८ व कमाल ३५ वर्षे असावे. यापूर्वी अशा प्रकारचे प्रशिक्षण घेतलेल्या किंवा प्रशिक्षण सत्र अर्धवट सोडलेल्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

पात्र इच्छुक उमेदवारांनी शैक्षणिक प्रमाणपत्रे व जातीच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रतींसह अर्ज २७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत आदिवासी उमेदवारांकरिता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, माहिती व मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या बाजूस, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड या कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

तामसा येथील जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस; दोन अट्टल आरोपी जेरबंद, १.०२ लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील जबरी चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कौठा परिसरात सापळा रचून तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. या कारवाईत दोन अट्टल आरोपींना अटक करून त्यांच्याकडून चोरीच्या व गुन्ह्यात वापरलेल्या दोन मोटारसायकली, एक मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख २ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांचे पथक नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कौठा परिसरात मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, दोन संशयित इसम चोरीचा मोबाईल आणि मोटारसायकल विक्रीसाठी नांदेड येथील नवीन कोर्टाच्या पाठीमागे थांबलेले आहेत. माहितीच्या आधारे पोलीस पथकाने दोन पंचांसह सदर ठिकाणी सापळा रचून दोन संशयितांना दोन मोटारसायकलींसह ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेले आरोपी प्रवीण प्रकाश दंडलवाड, वय २३, व्यवसाय मजुरी, रा. दत्त बर्डी रोड, आझाद चौक, हदगाव, सुरज प्रल्हाद रुडे उर्फ रुडावत, वय २३, व्यवसाय मजुरी, रा. वाजपेयी नगर, जुनी आबादी, हदगाव यांना ताब्यात घेतलेल्या दोन्ही आरोपींकडे सखोल विचारपूस केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. काही दिवसांपूर्वी वरील दोन आरोपी व कन्हैया पिराजी बाभुळकर, रा. वडरगल्ली, हदगाव (फरार) यांनी संगनमत करून मोटारसायकलवरून जात असताना तामसा येथील वाळकी फाटा ते दगडवाडी जाणाऱ्या रोडवर एका शाईन मोटारसायकल चालकाला ओव्हरटेक केल्याच्या कारणावरून गाडी आडवी लावून जबरदस्तीने फिर्यादीकडील रोख ९०० रुपये, निळ्या रंगाचा वनप्लस कंपनीचा मोबाईल आणि त्यांची होंडा शाईन मोटारसायकल जबरीने हिसकावून पळ काढला होता. याप्रकरणी पोलीस ठाणे तामसा येथे दि. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी गु.र.नं. २२७/२०२६, कलम ३०९(४), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.



विभागस्तरीय जिम्नॅस्टिक स्पर्धेत सैनिकी विद्यालयाचे यश



नांदेड (प्रतिनिधी)– क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित विभागस्तरीय शालेय जिम्नॅस्टिक आर्टिस्टिक्स क्रीडा स्पर्धेत राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालय, सगरोळीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

विद्यालयाचा कुशल विद्यार्थी अभिनव बालाजी पोतदार याने पहिल्याच प्रयत्नात आपल्या कौशल्यपूर्ण खेळाच्या जोरावर जिम्नॅस्टिक आर्टिस्टिक्स प्रकारात उल्लेखनीय यश मिळविले आणि प्रथमच राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड होण्याचा बहुमान मिळविला. त्याच्या या यशाने विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे संचालक, प्राचार्य, डम ऑफिसर, क्रीडा विभाग व सर्व शिक्षकांच्या वतीने अभिनवचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

तिकीट तपासणी मोहिमेत नांदेड विभागाचा नवा विक्रम; एकाच दिवसात १,४१५ प्रकरणे, १२.१९ लाखांचा महसूल जमा

नांदेड (प्रतिनिधी)– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने तिकीट तपासणीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी राबविण्यात आलेल्या विशेष सघन तिकीट तपासणी मोहिमेद्वारे एकाच दिवसात १२ लाख १९ हजार ४६५ रुपये इतका विक्रमी महसूल जमा केला. या मोहिमेदरम्यान एकूण १ हजार ४१५ प्रकरणे उघडकीस आली. नांदेड विभागाच्या इतिहासातील एका दिवसात तिकीट तपासणीद्वारे मिळालेला हा आतापर्यंतचा सर्वाधिक महसूल आहे.



यापूर्वी विभागाने १७ ऑक्टोबर २०२५ रोजी एका दिवसात १०.९ लाख रुपयांचा महसूल जमा करण्याचा उच्चांक नोंदविला होता. तो मागे टाकत नांदेड विभागाने आता १२.१९ लाखांहून अधिक महसूल जमा करून नवा ऐतिहासिक उच्चांक प्रस्थापित केला आहे.

ही विशेष सघन तिकीट तपासणी मोहीम ५ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री १ ते ११.४५ या वेळेत राबविण्यात आली. विभागातील सर्व स्कॉडमधील ३२ तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. या कालावधीत एकूण २७ गाड्यांची सखोल तपासणी करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान अनियमित प्रवासाची एकूण १ हजार ४१५ प्रकरणे उघडकीस आली. यामध्ये विनातिकीट प्रवासाची ८१८ प्रकरणे असून त्याद्वारे ८ लाख ५६ हजार ४२५ रुपये महसूल जमा झाला. यामध्ये ४,४३,७२० रुपये भाडे आणि ४ लाख १२ हजार ७०५ रुपये दंडाचा समावेश आहे.

तसेच अनियमित प्रवासाची ३९१ प्रकरणे उघडकीस आली. त्याद्वारे ३ लाख २५ हजार ८४५ रुपये महसूल जमा झाला. यामध्ये १ लाख २९ हजार ३९५ रुपये भाडे आणि १ लाख ९६ हजार ४५० रुपये दंडाचा समावेश आहे. याशिवाय विनाबुक केलेल्या सामानाची २०६ प्रकरणे आढळून आली असून, त्याद्वारे ३७,१९५ रुपये महसूल प्राप्त झाला.

या विशेष मोहिमेदरम्यान प्रवाशांची मोठी वर्दळ असलेल्या महत्त्वाच्या गाड्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. सचखंड एक्सप्रेस, देवगिरी एक्सप्रेस, नंदीग्राम एक्सप्रेस, तपोवन एक्सप्रेस, बेंगळुरू एक्सप्रेस, श्री गंगानगर एक्सप्रेस, पटना एक्सप्रेस, इंटरसिटी एक्सप्रेस, भगत की कोठी एक्सप्रेस, मराठवाडा एक्सप्रेस आणि वंदे भारत एक्सप्रेस यांसह अनेक महत्त्वाच्या गाड्यांमध्ये तिकीट तपासणी करण्यात आली.

नांदेड मनपा कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट; वेतन जमा होण्यास सुरुवात, ४०० कर्मचाऱ्यांना सण अग्रीम

नांदेड (प्रतिनिधी)– दिवाळीचा सण तोंडावर आला असताना वेतनाच्या प्रतीक्षेत असलेल्या नांदेड-वाघाळा महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. महापालिकेच्या सेवानिवृत्तांसह विद्यमान कर्मचाऱ्यांचे वेतन बुधवारपासून बँक खात्यात जमा होण्यास प्रारंभ झाला आहे. त्याचबरोबर कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही दिवाळीपूर्वी वेतन देण्यात येणार आहे. महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे.

गेल्या आठ ते दहा दिवसांपासून महापालिका कर्मचाऱ्यांना वेतनाची प्रतीक्षा होती. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर वेतन वेळेत मिळणार की नाही, याबाबत कर्मचाऱ्यांमध्ये चिंता होती. महापालिकेचे आर्थिक व्यवहार अडचणीत असताना नियमित मिळणारे जीएसटी अनुदानही लांबल्याने वेतनासाठी आर्थिक तरतूद करण्याचे आवाहन प्रशासनापुढे निर्माण झाले होते. या संदर्भात कर्मचारी संघटनांनी महापौरांसह प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेऊन वेतन लवकर देण्याची मागणी केली होती.

या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी ९ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील मंत्रालयात जाऊन वेतनासाठी आर्थिक तजवीज केली. त्यानंतर नांदेडला परततच त्यांनी वित्त विभागाला वेतनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले.

महापालिकेच्या १ हजार ४२० सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे ४ कोटी २१ लाख रुपये वेतन त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यास सुरुवात झाली आहे. तर १ हजार ३६० विद्यमान कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी ६ कोटी ४० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हे वेतन बुधवारपासून बँक खात्यात जमा होण्यास प्रारंभ झाला आहे.

प्रगतीमंत्र

नवरत्न कंपनीत 281 पदांसाठी भरती

लेखी परीक्षा, मुलाखत नाही, गुणांच्या आधारे निवड

पदवी, पदविका किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आयटीआय) अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या तरुणांसाठी सरकारी कंपनीत प्रशिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. केंद्र सरकारच्या नवरत्न दर्जाप्राप्त राइट्स लिमिटेड (RITES Limited) या कंपनीने २०२६ साठी अप्रेंटिसशिप प्रशिक्षणाच्या २८१ जागांसाठी भरती जाहीर केली आहे. या भरतीसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, इच्छुक उमेदवारांना २५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहे. या भरतीमध्ये पदवीधर अभियंता, पदवीधर बिगर-अभियांत्रिकी, पदविकाधारक आणि आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांसाठी जागा उपलब्ध आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना एक वर्षाचे प्रशिक्षण दिले जाणार असून, या कालावधीत दरमहा विद्यावेतनही मिळणार आहे.



लेखी परीक्षा आणि मुलाखतीशिवाय निवड

या भरतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उमेदवारांना लेखी परीक्षा किंवा मुलाखतीला सामोरे जावे लागणार नाही. उमेदवारांच्या शैक्षणिक गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करून निवड केली जाणार आहे. दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवारांचे गुण समान असल्यास वयाने मोठ्या असलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल. सर्वसाधारण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांसाठी किमान ६० टक्के गुणांची अट आहे, तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय (नॉन-क्रीमी लेअर) आणि दिव्यांग उमेदवारांसाठी किमान ५० टक्के गुण आवश्यक आहेत.

पदनिहाय जागा शैक्षणिक पात्रता

पदाचे नाव	जागा	शैक्षणिक पात्रता
पदवीधर अप्रेंटिस (अभियांत्रिकी)	१२५	मान्यताप्राप्त विद्यापीठातून बी.ई., बी.टेक. किंवा बी.आर्क. ही चार वर्षांची पूर्णवेळ पदवी
पदवीधर अप्रेंटिस (बिगर-अभियांत्रिकी)	४३	बी.ए., बी.बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. किंवा बी.सी.ए. ही तीन वर्षांची पदवी
पदविका अप्रेंटिस	६२	अभियांत्रिकीमधील तीन वर्षांची पूर्णवेळ पदविका
ट्रेड अप्रेंटिस (आयटीआय)	५१	पूर्णवेळ अभ्यासक्रमातून आयटीआय उत्तीर्ण
एकूण	२८१	

अर्ज कसा करावा?

इच्छुक उमेदवारांनी सर्वप्रथम संबंधित पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. पदवीधर आणि पदविकाधारक उमेदवारांनी राष्ट्रीय अप्रेंटिसशिप प्रशिक्षण योजना (NATS) पोर्टलवर नोंदणी करावी. आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांनी राष्ट्रीय अप्रेंटिसशिप प्रोत्साहन योजना (NAPS) पोर्टलवर नोंदणी करावी. नोंदणीनंतर मिळालेल्या वापरकर्ता क्रमांक किंवा ई-मेलच्या आधारे लॉगइन करावे. Apprenticeship Openings या विभागातील Opportunities पर्याय निवडून RITES Limited ही कंपनी शोधावी. अर्जामध्ये आवश्यक माहिती भरून संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपलोड कराव्यात. अर्जाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी apprentice.rites.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.

कोण अर्ज करू शकणार नाही?

५ नोव्हेंबर २०२६ या पात्रता निश्चितीच्या तारखेला अंतिम निकालाच्या प्रतीक्षेत असलेले उमेदवार तसेच १८ वर्षे पूर्ण न झालेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत. यापूर्वी अप्रेंटिसशिप प्रशिक्षण पूर्ण केलेले किंवा एक वर्ष अथवा त्यापेक्षा अधिक कामाचा अनुभव असलेले उमेदवारही या भरतीसाठी अपात्र असतील.

आवश्यक कागदपत्रे

अर्ज करताना शैक्षणिक गुणपत्रिका, पदवी किंवा पदविका उत्तीर्ण प्रमाणपत्र, आयटीआय गुणपत्रिका, जन्मतारखेचा पुरावा, ओळखपत्र, तसेच लागू असल्यास जात प्रमाणपत्र आणि ईडब्ल्यूएस प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. ही कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात आणि कमाल १० एमबी आकारात अपलोड करावी लागतील.

अर्ज करण्याची अंतिम मुदत : २५ नोव्हेंबर २०२६

भरतीसंदर्भात काही शंका असल्यास उमेदवारांना apprenticeship@rites.com या ई-मेलवर संपर्क साधता येईल. संपर्क करताना NATS/NAPS नोंदणी क्रमांक, संपूर्ण नाव आणि संपर्काची माहिती देणे आवश्यक आहे.



कोण अर्ज करू शकणार नाही?

५ नोव्हेंबर २०२६ या पात्रता निश्चितीच्या तारखेला अंतिम निकालाच्या प्रतीक्षेत असलेले उमेदवार तसेच १८ वर्षे पूर्ण न झालेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत. यापूर्वी अप्रेंटिसशिप प्रशिक्षण पूर्ण केलेले किंवा एक वर्ष अथवा त्यापेक्षा अधिक कामाचा अनुभव असलेले उमेदवारही या भरतीसाठी अपात्र असतील.

दरमहा किती विद्यावेतन मिळणार?

- प्रशिक्षणाच्या कालावधीत उमेदवारांना त्यांच्या प्रवर्गानुसार दरमहा विद्यावेतन दिले जाणार आहे.
- पदवीधर अप्रेंटिस : १५,६५० रुपये
- पदविका अप्रेंटिस : १३,४५० रुपये
- ट्रेड अप्रेंटिस (आयटीआय) : १०,५६० रुपये

पाच वर्षांची नोकरी सोडून उद्योजकतेची वाट धरली; अवघ्या सहा महिन्यांत लाखोंची कमाई!

अक्षिता गोयल यांचा प्रेरणादायी प्रवास; 'नॅपो' या पिझ्झा व्यवसायातून महिन्याला 5.6 लाखांची उलाढाल, तर 2.3 लाखांचा निव्वळ नफा

आयुष्यात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी योग्य वेळी घेतलेला निर्णय किती महत्त्वाचा ठरू शकतो, याचे उदाहरण अक्षिता गोयल यांनी घालून दिले आहे. पाच वर्षे खासगी कंपनीत नोकरी केल्यानंतर त्यांनी वेगळ्या क्षेत्रात पाऊल ठेवण्याचा निर्णय घेतला. अवघ्या सहा महिन्यांपूर्वी सुरू केलेल्या पिझ्झा व्यवसायातून आज त्या लाखोंची कमाई करत आहेत. अक्षिता यांनी एप्रिल २०२६ मध्ये 'नॅपो' (NAPO) या नावाने स्वतःचा व्यवसाय सुरू केला. इटलीतील नेपोलिटन पद्धतीचा अस्सल पिझ्झा सर्वसामान्य ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून देणे, ही त्यांच्या व्यवसायामागील संकल्पना आहे. सप्टेंबर २०२६ पर्यंत त्यांच्या व्यवसायाची मासिक उलाढाल ५.६ लाख रुपयांवर पोहोचली, तर निव्वळ नफा सुमारे २.३ लाख रुपये झाला.







अशी सुचली व्यवसायाची कल्पना

अक्षिता यांनी संवाद रचना या विषयात पदवी शिक्षण घेतले आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी गुरुग्राम येथील गार्टनर या तंत्रज्ञान कंपनीत ग्राफिक्स डिझायनर म्हणून पाच वर्षे काम केले. जुलै २०२५ मध्ये त्या कौटुंबिक व्यवसायाला हातभार लावण्यासाठी लखनौला परतल्या. मात्र, स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची त्यांची इच्छा होती. बाजारपेठेचा अभ्यास करताना त्यांच्या लक्षात आले की, महागड्या उपाहारगृहांमधील दर्जेदार नेपोलिटन पिझ्झा आणि रस्त्यावरील सर्वसामान्य पिझ्झा यांच्यामध्ये मोठी तफावत आहे. एकीकडे महागडे पिझ्झा, तर दुसरीकडे अपेक्षित दर्जाचा अभाव, अशी परिस्थिती होती. ही दरी भरून काढण्याचा त्यांनी निर्णय घेतला. नोव्हेंबर २०२५ मध्ये त्यांनी या कल्पनेवर काम सुरू केले. स्वतःच्या बचतीतील १२ लाख रुपये गुंतवून एप्रिल २०२६ मध्ये लखनौमधील सुशांत गोल्फ सिटी परिसरात व्यवसाय सुरू केला. यासाठी त्यांनी १२ बाय ७ फूट आकाराचा स्वतंत्र, आधुनिक स्वयंपाकघर असलेला फिरता ट्रेलर उभारला.

सहा महिन्यांत 3,500 हून अधिक पिझ्झांची विक्री

व्यवसाय सुरू केल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांत अक्षिता यांनी ३,५०० हून अधिक पिझ्झांची विक्री केली आहे. सध्या दरमहा सरासरी ९०० पिझ्झांची विक्री होत आहे. विशेष दिवसांमध्ये एका दिवसाची विक्री ३० ते ४० हजार रुपयांपर्यंत पोहोचते. स्विगी आणि झोमॅटो या ऑनलाइन खाद्यपदार्थ वितरण मंचांवरही 'नॅपो' उपलब्ध आहे. मात्र, अक्षिता प्रत्यक्ष ग्राहकांना मिळणारा अनुभव आणि उत्पादनाचा दर्जा यांना अधिक महत्त्व देत आहेत. उद्योजकतेचा प्रवास आव्हानांनी भरलेला असला, तरी आर्थिक शिस्त, सातत्य आणि गुणवत्तेच्या जोरावर व्यवसाय यशस्वी करता येतो, हे अक्षिता यांच्या प्रवासातून दिसून येते. लखनौच्या खाद्यसंस्कृतीत 'नॅपो'ला एक वेगळी ओळख मिळवून देणे, हे त्यांचे पुढील उद्दिष्ट आहे. इटालियन पद्धतीचा अस्सल पिझ्झा केवळ खास प्रसंगी नव्हे, तर सर्वसामान्यांच्या रोजच्या संध्याकाळचाही आवडता खाद्यपदार्थ बनवण्याचे त्यांचे स्वप्न आहे.

सुरुवातीला तोटा, अनेक अडचणींचा सामना

अक्षिता यांनी संवाद रचना या विषयात पदवी शिक्षण घेतले आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी गुरुग्राम येथील गार्टनर या तंत्रज्ञान कंपनीत ग्राफिक्स डिझायनर म्हणून पाच वर्षे काम केले. जुलै २०२५ मध्ये त्या कौटुंबिक व्यवसायाला हातभार लावण्यासाठी लखनौला परतल्या. मात्र, स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची त्यांची इच्छा होती. बाजारपेठेचा अभ्यास करताना त्यांच्या लक्षात आले की, महागड्या उपाहारगृहांमधील दर्जेदार नेपोलिटन पिझ्झा आणि रस्त्यावरील सर्वसामान्य पिझ्झा यांच्यामध्ये मोठी तफावत आहे. एकीकडे महागडे पिझ्झा, तर दुसरीकडे अपेक्षित दर्जाचा अभाव, अशी परिस्थिती होती. ही दरी भरून काढण्याचा त्यांनी निर्णय घेतला. नोव्हेंबर २०२५ मध्ये त्यांनी या कल्पनेवर काम सुरू केले. स्वतःच्या बचतीतील १२ लाख रुपये गुंतवून एप्रिल २०२६ मध्ये लखनौमधील सुशांत गोल्फ सिटी परिसरात व्यवसाय सुरू केला. यासाठी त्यांनी १२ बाय ७ फूट आकाराचा स्वतंत्र, आधुनिक स्वयंपाकघर असलेला फिरता ट्रेलर उभारला.

सुरुवातीला तोटा, अनेक अडचणींचा सामना

अक्षिता यांना खाद्यपदार्थ आणि पेय उद्योगाचा कोणताही पूर्वानुभव नव्हता. त्यामुळे सुरुवातीचा प्रवास आव्हानात्मक ठरला. पहिल्याच महिन्यात त्यांना दीड लाख रुपयांचा तोटा सहन करावा लागला. सुरुवातीला ग्राहकांनी त्यांच्या पिझ्झाच्या कणकेची तुलना नान आणि भाजीशी केली. त्यामुळे उत्पादनाचा दर्जा सुधारण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. पहिल्या आचाऱ्यासोबत त्यांनी जवळपास तीन महिने प्रयोग केले. केवळ लाल सॉसची चव योग्य बनवण्यासाठी ५० पेक्षा अधिक वेळा चाचण्या घेतल्या. त्यानंतर पिझ्झा तयार करण्यासाठी काही निश्चित नियमावली तयार केली. जून २०२६ मध्ये स्थानिक समाजमाध्यम प्रभावकांच्या सहकार्यामुळे त्यांच्या व्यवसायाची लोकप्रियता वाढू लागली.


सहा महिन्यांत लाखोंची उलाढाल

'नॅपो'च्या मेन्यूमध्ये सहा प्रकारचे शाकाहारी आणि दोन प्रकारचे मांसाहारी पिझ्झा उपलब्ध आहेत. याशिवाय पास्ता, चिकन विंग्स आणि स्वतः तयार केलेल्या तिरामिसू या गोड पदार्थांचाही समावेश आहे. पिझ्झाच्या किमती ३९० ते ५२० रुपयांदरम्यान आहेत. एका ऑर्डरची सरासरी किंमत ५०० ते ६०० रुपये आहे. व्यवसाय वाढत असताना आचाऱ्याने अचानक नोकरी सोडणे, बिलिंगमधील गैरव्यवहार आणि गुगलवरील ग्राहकांच्या अभिप्रायांशी संबंधित अडचणी अशा अनेक समस्यांना अक्षिता यांना सामोरे जावे लागले. मात्र, त्यांनी हार न मानता व्यवसायाचा विस्तार सुरू ठेवला. मे २०२६ मध्ये त्यांच्या व्यवसायाची उलाढाल १.३ लाख रुपये होती, तर निव्वळ नफा ३० हजार रुपये होता. सप्टेंबरमध्ये हीच मासिक उलाढाल ५.६ लाख रुपयांवर पोहोचली आणि निव्वळ नफा २.३ लाख रुपयांपर्यंत वाढला.

गेल इंडिया लिमिटेडमध्ये कायद्याच्या पदवीधरांसाठी भरती; महिन्याला पावणेतीन लाखांपर्यंत वेतन!

कमाल वयोमर्यादा 52 वर्षे; 2 डिसेंबरपर्यंत अर्ज करता येणार

सरकारी क्षेत्रात वरिष्ठ पदावर काम करण्याची इच्छा असलेल्या कायद्याच्या पदवीधरांसाठी गेल इंडिया लिमिटेडने भरती जाहीर केली आहे. कंपनीकडून मुख्य महाव्यवस्थापक (कायदा) या पदासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. विशेष म्हणजे, या पदासाठी कमाल वयोमर्यादा ५२ वर्षे निश्चित करण्यात आली असून, निवड झालेल्या उमेदवाराला दरमहा २ लाख ८० हजार रुपयांपर्यंत वेतन मिळू शकते. गेल इंडिया लिमिटेड ही केंद्र सरकारच्या अखत्यारीतील सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आहे. कंपनीने या भरतीसाठी अधिकृत संकेतस्थळावर अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांना २ डिसेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे.



- शैक्षणिक पात्रता काय? : मुख्य महाव्यवस्थापक (कायदा) या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान ५० टक्के गुणांसह पदवी पूर्ण केलेली असावी. त्यानंतर तीन वर्षांचा एलएलबी अभ्यासक्रम किमान ५० टक्के गुणांसह पूर्ण केलेला असावा किंवा पाच वर्षांचा एकात्मिक व्यावसायिक एलएलबी अभ्यासक्रम किमान ५० टक्के गुणांसह पूर्ण केलेला असावा. कायद्यामधील पदव्युत्तर पदवी (एलएलएम) असलेल्या उमेदवारांनाही पात्रतेच्या अटींनुसार अर्ज करता येईल. या पदव्या नियमित अभ्यासक्रमातून प्राप्त केलेल्या असणे आवश्यक आहे.
- २४ वर्षांचा कार्यानुभव आवश्यक : शैक्षणिक पात्रतेबरोबरच उमेदवारांकडे पदवी प्राप्त केल्यानंतरचा किमान २४ वर्षांचा कार्यकारी स्तरावरील अनुभव असणे आवश्यक आहे. त्यापैकी किमान १६ वर्षांचा अनुभव कायदेविषयक कामकाजाचा असावा. तसेच, कायदेविषयक संस्थेमध्ये (लॉ फर्म) आठ वर्षे काम केलेला अनुभवही ग्राह्य धरला जाऊ शकतो. वकील म्हणून काम केले असल्यास संबंधित उमेदवाराची बार कौन्सिलमध्ये नोंदणी असणे आवश्यक आहे. या पदासाठी कमाल वयोमर्यादा ५२ वर्षे आहे. दिव्यांग (पीडब्ल्यूबीडी) प्रवर्गातील उमेदवारांना नियमानुसार १० वर्षांची वयोमर्यादेत सवलत देण्यात येणार आहे.
- महिन्याला मिळणार २.८० लाखांपर्यंत वेतन : निवड झालेल्या उमेदवारांना १ लाख २० हजार ते २ लाख ८० हजार रुपये या वेतनश्रेणीनुसार वेतन मिळणार आहे. सुरुवातीचे मूळ वेतन १ लाख २० हजार रुपये असेल. याशिवाय महागाई भत्ता, विविध भत्ते, कामगिरीशी संबंधित वेतन, घरभाडे भत्ता, वैद्यकीय सुविधा, समूह विमा, गृहबांधणीसाठी आगाऊ रक्कम, प्रवासासाठी आगाऊ रक्कम, भविष्य निर्वाह निधी, उपदान आणि निवृत्तिवेतन अशा सुविधाही कंपनीच्या नियमानुसार मिळतील. निवड झालेल्या उमेदवाराचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असेल.
- परीक्षा नाही; मुलाखतीद्वारे निवड : या भरतीसाठी लेखी परीक्षा घेतली जाणार नाही. उमेदवारांची निवड प्रामुख्याने गटचर्चा आणि मुलाखतीद्वारे केली जाणार आहे. अर्जांची संख्या अधिक असल्यास कंपनीकडून अतिरिक्त छाननीचे निकष लागू केले जाऊ शकतात. मुलाखतीच्या पात्रतेसाठी उमेदवारांना किमान ६० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. तसेच गटचर्चा, लेखन चाचणी आणि अन्य मूल्यमापन प्रक्रियेत किमान ४० टक्के गुण मिळवावे लागतील. अंतिम निवड कंपनीच्या भरतीविषयक नियमांनुसार केली जाईल.

कंपनी	गेल इंडिया लिमिटेड
पदाचे नाव	मुख्य महाव्यवस्थापक (कायदा)
वेतनश्रेणी	ई-८
रिक्त पदे	१
कमाल वयोमर्यादा	५२ वर्षे
अर्जाची अंतिम मुदत	२ डिसेंबर २०२६
निवड प्रक्रिया	छाननी, गटचर्चा आणि मुलाखत
अधिकृत संकेतस्थळ	www.gailonline.com

अर्ज कुठे आणि कसा कराल?

- इच्छुक उमेदवारांनी गेल इंडिया लिमिटेडच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन भरतीची सविस्तर जाहिरात वाचावी आणि ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी.
- अधिकृत संकेतस्थळ : https://www.gailonline.com
- अर्ज करण्याची अंतिम तारीख : २ डिसेंबर २०२६
- अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी शैक्षणिक पात्रता, अनुभव, वयोमर्यादा आणि अन्य अटींची अधिकृत जाहिरातीतून खात्री करून घ्यावी.

शेतीच्या बांधावर जाऊन मुख्यमंत्र्यांनी केली पिकांची पाहणी

नागपूर (प्रतिनिधी)– पावसाअभावी शेतातील कापूस व तुरीची झाडे सुकत असून अशा परिस्थितीत कापसाची शेती करणारा शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा शेतकऱ्यांना तातडीने आवश्यक मदत देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कळमेश्वर तालुक्यातील कोहळी या गावातील बाबुराव काळे या शेतकऱ्याला दिली

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेण्यासाठी व त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी लोहारी सावंगा या गावाला मुक्काम केला होता. आज मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी केली तसेच दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी शासन सोबत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.


लोहारी सावंगा येथून सकाळी सोनेगाव येथे येथील दिलीप सरोदे या शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन दुष्काळामुळे कापूस पिकांच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. पावसाअभावी कापसाची वाढ झाली नाही तसेच कापसाची बोंड सुद्धा फुटली नाहीत त्यामुळे शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत खचून न जाता शेतकऱ्यांना मदत करण्यात येत असल्याचे यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दुष्काळामुळे शेती नष्ट झाली असतानाच वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास असल्यामुळे सौर कुंपण उपलब्ध करून द्यावे अशी मागणी यावेळी दिलीप सरोदे या शेतकऱ्यांनी केली.

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



जाहीर पत्रक
नगर पंचायत, हिमायतनगर
जा.क्र.९३३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. ४९८ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, नंदिनी दिनेश पांचाळ व सुनंदा प्रल्हाद कोनप्रतवार रा. करंजी बोधडी ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४९८ वार्ड न. १७ प्रविणकुमार जन्नावार व इतर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १२८०/२०२६ दि. २९/१०/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - ३ मीटरचा कॉलनी रस्ता,
पश्चिमेस - प्लॉट क्र. ३६,
दक्षिणेस - प्लॉट क्र. ४२, उत्तरेस - प्लॉट क्र. ४०.

मुख्याधिकारी
नगर पंचायत, हिमायतनगर

जाहीर पत्रक
नगर पंचायत, हिमायतनगर
जा.क्र.९३२

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०५ मालमत्ता क्र. १२३/५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, नागेद्र शंकर ढोणे रा. प्रतापगल्ली, हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १२३/५ वार्ड न. ०५ शंकर गंगाराम ढोणे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७३३/२०२६ दि. १९/१०/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - रस्ता,
पश्चिमेस - राजू हेंद्रे,
दक्षिणेस - रामराव गंगाराम ढोणे,
उत्तरेस - बालाजी आगतकर.

मुख्याधिकारी
नगर पंचायत, हिमायतनगर

Change In Name

I have changed my name from **KHAKSA HARPREETSINGH VITHALSINGHKHALSA** (Old Name) to **HARPREET SINGH VITHAL SINGH KHALSA** (New Name) for all future and official purposes.

Henceforth, all my official identity documents, records, bank accounts, and future correspondence will be conducted under my new name **HARPREET SINGH VITHAL SINGH KHALSA**. Please treat this notice as a formal public declaration.

Address:
S/o Vithal Singh Khalsa, Ghar No. 1-13-981, Nandigram Society,
Town Market, Nanded, Maharashtra - 431601

Change In Name

My old Name is **URMILA UMAKANTRAO AMILKANTHWAR** Which now I am Changing as New Name **SHITAL SANJAY YERAWAR** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: H.No. 1-9-228, Vivek Nagar Nanded- 431602

Change In Name

I, **SAMRA FATIMA GULAM MOHAMMED HYDER**, residing at H. No. 2-5-182, Near Bara Imam Masjid, Khadakpura, Nanded – 431601, Maharashtra, hereby declare that I have changed my name from **SAMRA FATIMA D/O MOHD. ISMAIL** (Old Name Before Marriage) to **SAMRA FATIMA GULAM MOHAMMED** HYDER (New Name After Marriage).

Henceforth, I shall be known by my new name, **SAMRA FATIMA GULAM MOHAMMED HYDER,** for all official and legal purposes.

This declaration is made for the information of the general public.

Address: H. No. 2-5-182, Near Bara Imam Masjid, Khadakpura, Vazirabad S.O., Nanded, Maharashtra – 431601.

जाहीर पत्रक
नगर पंचायत, हिमायतनगर
जा.क्र.९३४

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. ४६५ अ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सलमाबी इलियास रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४६५ अ वार्ड न. १९ उत्तम बळीराम चव्हाण यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १२४२/२०२६ दि. २९/१०/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - शेख इलियास शेख कलाम,
पश्चिमेस - अंतर्गत रस्ता,
दक्षिणेस - अंतर्गत रस्ता, उत्तरेस - मोकळी जागा.

मुख्याधिकारी
नगर पंचायत, हिमायतनगर



जाहीर पत्रक
नगर पंचायत, हिमायतनगर
जा.क्र.९३८

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. ३४६ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेरखान जियाउल्लाखान समीउल्लाखान रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ३४६ वार्ड न. १९ जियाउल्लखान हुसेनखान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ३२९३/२०२६ दि. २८/०९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - खुला प्लॉट,
पश्चिमेस - रोड,
दक्षिणेस - रोड, उत्तरेस - फेरोजखान साजीदखान.

मुख्याधिकारी
नगर पंचायत, हिमायतनगर

जाहीर पत्रक
नगर पंचायत, हिमायतनगर
जा.क्र.२३७

नाव परिवर्तन वार्ड क्र. १४ मालमत्ता क्र. ४१० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, तस्लीम फिरदोस शेख हुसेन रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४१० वार्ड न. १४ शेख हुसेन शेख अखिल यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ४३४८/२०२६ दि. १४/१०/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - इरफान यांचा प्लॉट,
पश्चिमेस - महेमुद यांचा प्लॉट,
दक्षिणेस - रोड, उत्तरेस - इरशाद व महेमुद यांचा प्लॉट.

मुख्याधिकारी
नगर पंचायत, हिमायतनगर

जाहीर पत्रक
नगर पंचायत, हिमायतनगर
जा.क्र.९३६

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. ३४८/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख अलीम शेख हबीब रा. नईआबादी ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ३४८/२ वार्ड न. १९ शेख हबीब शेख वाहेदसाब यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ५६४४/२०२६ दि. ०२/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - रोड,
पश्चिमेस - फकीर अहेमद साब,
दक्षिणेस - फेरोज यांचा प्लॉट,
उत्तरेस - शेख अलीम शेख हबीब.

मुख्याधिकारी
नगर पंचायत, हिमायतनगर

जाहीर पत्रक
नगर पंचायत, हिमायतनगर
जा.क्र.९३५

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०६ मालमत्ता क्र. २०/१ब या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, स्वप्निल शंकरराव चेलमेलवार रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २०/१ब वार्ड न. ०६ शंकर उद्धव चेलमेलवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ६५९१/२०२६ दि. ०८/११/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - शंकर उद्धव चेलमेलवार,
पश्चिमेस - रोड,
दक्षिणेस - रोड, उत्तरेस - उद्धव रामकृष्ण चेलमेलवार.

मुख्याधिकारी
नगर पंचायत, हिमायतनगर



डॉ. शंकरराव चव्हाण कृषि उत्पन्न बाजार समिती, भोकर जि. नांदेड

मराठवाड्यातील एक आदर्श बाजार समिती

मुख्य बाजार: भोकर — दुय्यम बाजार: किनी मातुळ
स्थापना दिनांक: २५/८/१९६० — फोन नं. २२२६३४,२२२८४६

मार्केटचा कायदा -- शेतकऱ्यांचा फायदा

बाजार समितीचे खास वैशिष्ट्ये :– १) शेतीमालाची उघड पध्दतीने लिलाव व विक्री. २) नगदां चुकोतोची हमी. ३) वाद्यांचा त्वरीत निकाल व निवाडा. ४) शेतकऱ्यांना व गुरांना पिण्याच्या पाण्याची खास व्यवस्था. ५) सुसज्ज व भव्य शेतकरी निवासमध्ये राहण्याची व्यवस्था. ६) सुलभ शौचालय ७) ५० टनी वजनी काटा ८) शेतकऱ्यांना ऑनलाईन बाजारभाव सुविधा ९) शेतकऱ्यांच्या अडीअडचणी बाजार समिती कर्मचाऱ्यांकडून तत्परतेने व आदराने सोडविल्या जातात. १०) भोकर बाजार समिती ई- नाम मध्ये आलेली आहे. ११) शेतकऱ्यांसाठी भव्य दिव्य लिलाव शेड उभारण्यात आले आहे.

सचिव — श्री.पि.यू. सुर्यवंशी
उपसभापती — श्री.बालाजी गंगाधरराव शानमवाड
सभापती — श्री. जगदिश बालाजीराव पाटील

कृषि उत्पन्न बाजार समिती, भोकर

सर्व सन्माननिय संचालक मंडळ

सर्वश्री

१. श्री. रामचंद्र विठ्ठलराव मुसळे
२. श्री. गणेश देवराव कापसे
३. श्री. सुभाष तुळशिराम पाटील
४. श्री. किशोर मारोतराव कदम
५. श्री. उज्वल किशोरराव केसराळे
६. श्री. राजकुमार लक्ष्मणराव अंगरवार
७. श्री. गणेश पांडुरंगराव राठोड
८. श्री. विश्वांबर गोपाळराव पवार
९. श्री. केशव माधवराव सोळंके
१०. सौ. ज्योती शिवाजी कदम
११. सौ. वर्षा आनंदराव देशमुख
१२. श्री. किशन सखाराम वागतकर
१३. श्री. व्यंकटराव सोनबा जाधव
१४. श्री. पंकज सखाहरी पोकलवार
१५. श्री. सारंग अशोककुमार मुंदडा
१६. श्री. स. खालेद सय्यद रफिक

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

शिवसेनेची दिवाळी शेतकऱ्यांच्या बांधावर

मंत्री उदय सामंतांनी नांदेडच्या सायाळमध्ये शेतकरी कुटुंबासोबत साजरी केली दिवाळी

नांदेड (प्रतिनिधी)– राज्यात दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने यंदाची दिवाळी दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांसोबत साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत हे नांदेड जिल्ह्यातील सायाळ येथे शेतकरी कुटुंबासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी रविवारी नांदेड जिल्हा दौऱ्यावर होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना जिल्ह्यात



शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी केली.

यावेळी बोलताना मंत्री उदय सामंत म्हणाले, दरवर्षी आपण घरी दिवाळी साजरी करतो. पण यंदा शेतकरी हेच आमचे कुटुंब आहे. संकटात असलेला प्रत्येक शेतकरी आमच्यासाठी आणि महायुतीसाठी विशेष आहे. त्यांच्या बांधावर जाऊन, त्यांच्यासोबत फराळ करत सुख-दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्या मनाला आधार देणे, हीच यंदाच्या दिवाळीची खरी भावना आहे.

शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी समजून घेणे, शासकीय मदत त्यांच्यापर्यंत पोहोचते आहे की नाही याचा आढावा घेणे, हा या भेटीचा उद्देश असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी नामदार हेमंत पाटील, आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्यासह शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, गावकरी उपस्थित होते.

दिवाळीचा उत्साह, पण सुरक्षेचा अभाव; हदगावात फटाक्यांच्या दुकानांजवळ अग्निशमन बंबच नाही!

हदगाव (प्रतिनिधी)– दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह आणि रोषणाईचा उत्सव. मात्र या उत्सवाच्या काळात नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

हदगाव शहरात दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी फटाक्यांची दुकाने थाटण्यात आली आहेत. फटाक्यांची विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असताना संभाव्य आग दुर्घटना टाळण्यासाठी तसेच एखादी अनुचित घटना घडल्यास तातडीने मदत मिळावी यासाठी अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी किंवा जवळच्या परिसरात सज्ज असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र दुर्देवाची बाब म्हणजे, हदगाव शहरात फटाक्यांची दुकाने सुरू असतानाही अग्निशमन दलाची गाडी कुठेही दिसून येत नाही. मग एखादी आग लागण्याची दुर्घटना घडली, जीवितहानी झाली किंवा मोठे आर्थिक नुकसान झाले तर त्याची जबाबदारी नेमकी कोण घेणार?

दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये, यासाठी खबरदारी घेणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी नाही का? प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन फटाका विक्रीच्या ठिकाणी अग्निशमन दलाची गाडी, प्रशिक्षित कर्मचारी आणि आवश्यक अग्निसुरक्षा साधने तातडीने उपलब्ध



करून द्यावीत, अशी मागणी होत आहे.

सध्या शहरामध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामाच्या नावावरून ठिकठिकाणी रस्त्यांचे खोदकाम केले आहे. तसेच शहरामध्ये अतिक्रमणे वाढली आहेत व सणानिमित्त सर्व बाजारपेठ गजबजली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू आहे. त्यामुळे अनुचित प्रकार घडल्यास साधे टू व्हीलर वाहनसुद्धा जाण्यासाठी बराचसा वेळ लागत आहे. तसेच फायर ब्रिगेडसारखे वाहन वेळेवर पोहोचणे तर शक्यच नाही. पण नगरपालिकेच्या इमारतीमध्ये अग्निशामन दल मोठ्या थाटामध्ये उभे असताना दिसून येत आहे. त्यामुळे शहरांमध्ये अग्निशामन दल वेळेवर पोहोचेल का हा प्रश्न मात्र यावेळी नागरिकांमध्ये चर्चिला जात आहे.



नांदेड – गोदावरी काठावर दिवाळी पहाटच्या पहिल्या दिवशी प्रख्यात गायिका मृदूला दाढे यांच्या गायनाचा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगीच्या छायाचित्रात गायक अमोल चव्हाण तसेच निवेदक डॉ. नंदू मुलमुले. **(छाया : करणसिंह बैस नांदेड)**

दिवाळी पहाटच्या सुरेल स्वरांनी भोकरकरांची सकाळ भक्तिमय होणार

◆ भोकर विचार विकास मंचतर्फे ११ नोव्हेंबर रोजी 'भक्ती-भाव सरगम' कार्यक्रमाचे आयोजन



भोकर (प्रतिनिधी) – दिवाळी सणाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी भोकर विचार विकास मंचच्या वतीने यंदा दिवाळी पहाटनिमित्त बहारदार गीतांचा 'भक्ती-भाव सरगम' हा विशेष संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. बुधवार, दि. ११ नोव्हेंबर रोजी पहाटे ५.३० वाजता भोकर येथील माऊली धाम, मोंढा येथे हा कार्यक्रम रंगणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणून पुणे येथील सुप्रसिद्ध गायिका कु. अंजली गायवाड व कु. नंदिनी गायवाड या भगिनी उपस्थित राहणार आहेत. सारेगमप लिटिल चॅम्प विजेत्या, झी संगीत सम्राट विजेत्या तसेच इंडियन आयडॉल फेम गायिका आपल्या सुमधुर स्वरांतून भक्तिगीत आणि बहारदार गीतांची सुरेल मैफल सादर करणार आहेत.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मोरेश्वर तपस्वी, बालयोगी वंदनीय स्वामी महाराज तसेच महंत उन्मेषानंद महाराज, श्री दत्त संस्थान, कैलास गड, भोकर यांची उपस्थिती लाभणार आहे. संगीत संयोजक म्हणून प्रणव पडोळे स्वामी, तर सूत्रसंचालनाची जबाबदारी सुरेश दंडवते सांभाळणार आहेत. या संगीत मैफलीत पुणे व नांदेड येथील नामवंत वादक आणि गायक कलाकारांचीही साथ लाभणार असून, दिवाळीच्या मंगलमय वातावरणात पहाटेची वेळ भक्तिगीतांच्या सुरांनी आणि संगीताच्या स्वरांनी भारावून जाणार आहे.

भोकर विचार विकास मंचचे अध्यक्ष डॉ. यू. एल. जाधव, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. व्यंकट माने, उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल माने, सचिव डॉ. राजेश्वर रेड्डी लोकावाड व मंचाच्या सर्व सदस्यांनी नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.


केवळबाई कल्याणकर यांचे निधन



अर्धापूर (प्रतिनिधी)– तालुक्यातील पिंपळगाव म. येथील महिला ज्येष्ठ नागरिक केवळबाई विठ्ठलराव कल्याणकर यांचे वृद्धापकाळाने रविवार, दि. ८ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि.९ रोजी सकाळी ११ वाजता पिंपळगाव म. येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.







Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com